प्रकरण : ३

# यंत्रमाग कामगारांची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी

# प्रकरण : तिसरे

# यंत्रमाग कामगारांची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी

---

**प्रस्तावना :**

पद्धतीशास्त्र प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे सोलापूर शहरातील यंत्रमाग कामगारांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी हेतुलक्ष्यी नमुना **(Purposive Sampling)** निवड पद्धतीचा अवलंब करून सोलापूरातील १० यंत्रमाग कारखान्यातील विविध प्रकारचे काम करणाऱ्या १५० कामगारांची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन माहिती मिळविली. विविध परिवर्त्यांच्या आधारे उपलब्ध माहितीचे वर्गीकरण करून कामगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. सदर माहितीचे सादरीकरण आणि विश्लेषण खाली दिले आहे.

**३.१ वय : (Age)**

कामगारांचे वयानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ३.१**

**उत्तरदात्यांचे (कामगारांचे) वयानुसार केलेले वर्गीकरण**

| अ.क्र. | वय | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १८ ते ३० | ४८ | ३२.00% |
| २ | ३१ ते ५० | ७५ | ५०.00% |
| ३ | ५० पेक्षा जास्त | २७ | १८.00% |
| | एकूण | १५० | १००.00% |

सारणी क्रमांक ३.१ मध्ये दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, अर्धे (५०.00%) उत्तरदाते प्रौढ वयोगटातील आहेत. त्या खालोखाल तरूण गटातील

(३२ .0%) कामगार असून वयोवृद्ध लोकांचे प्रमाण सापेक्ष कमी (१८ .0%) असल्याचे दिसून येते. घरातील हालाखीच्या, दारिद्र्याच्या परिस्थितीमुळे काही पालक, आई-वडील आपल्या घरातील १८ वर्षावरील मुलांना कारखान्यात कामास पाठवून देतात.

### ३.२ लिंग : (Sex)

उत्तरदात्यांचे लिंगानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.२ मध्ये सादर केले आहे.

**सारणी क्रमांक ३.२**

**उत्तरदात्यांचे लिंगानुसार केलेले वर्गीकरण**

| अ.क्र. | लिंग | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुरूष | ११८ | ७८.७% |
| २ | स्त्रिया | ३२ | २१.३% |
| | एकूण | १५0 | १00.00% |

सारणी क्रमांक ३.२ मध्ये सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य (७८.७%) कामगार हे पुरूष होते. तर उर्वरित (२१.३%) कामगार ह्या स्त्रिया होत्या.

### ३.३ कामगारांचा शैक्षणिक दर्जा : (Educational status of labour)

भारतात शिक्षण प्रसार मोहिम आघाडीवर असून देखील साक्षरतेच्या प्रमाणात पाहिजे तशी प्रगती झाली नाही. सन २00१ च्या जनगणने नुसार भारतातील एकूण लोकसंख्येपैंकी ६५.३८ टक्के लोक साक्षर आहेत. २00१ मध्ये भारतात साक्षर पुरूषांचे प्रमाण ७५.९६ टक्के होते तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ५४.२८% होते. (www.planetread.org/literacy.php)

### सारणी क्रमांक ३.३

### कामगारांचे शैक्षणिक दर्जानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | शैक्षणिक दर्जा | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निरक्षर | ५७ | ३८.0% |
| २ | इयत्ता ७ वी पर्यत | ६७ | ४४.७% |
| ३ | ८ वी ते १२ वी पर्यत | २१ | १४.0% |
| ४ | पदवीपर्यत | 0४ | 0२.७% |
| ५ | पदव्युत्तर | 0१ | 00.६% |
| | एकूण | १५0 | १00.00% |

सारणी क्रमांक ३.३ मधील आकडेवारी वरून असे दिसून येते की, ३८.0% कामगार निरक्षर असल्याचे दिसून आले तर उर्वरित सर्व कामगार साक्षर असल्याचे दिसून आले. साक्षरांमध्ये, ७ वी पर्यत शिक्षण झालेले बहुसंख्य कामगार होते तर केवळ एक कामगार पदव्युत्तर शिक्षण घेतलेला दिसून आला.

### ३.४ धर्म : (Religion)

कामगारांचे धर्मानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.४ मध्ये सादर केले आहे.

### सारणी क्रमांक ३.४

### कामगारांचे धर्मानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | कामगारांचे धर्म | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | १३२ | ८८.0% |
| २ | मुस्लिम | १६ | १0.७% |
| ३ | ख्रिश्चन | 0२ | 0१.३% |
| | एकूण | १५0 | १00.00% |



15560

सारणी क्रमांक ३.४ मध्ये सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य (८८.0%) कामगार हिंदू धर्माचे, १0.७% कामगार मुस्लिम धर्मीय तर 0२ कामगार खिश्चन धर्मीय होते. हिंदुधर्मीय कामगार बहुसंख्येने आढळून आले.

**३.५ जात / समुदाय : (Caste / Community)**

कामगारांचे जात समुदायानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.५ मध्ये दशविले आहे.

**सारणी क्रमांक ३.५**

**कामगारांचे जात / समुदायानुसार केलेले वर्गीकरण**

| अ.क्र. | कामगारांचे धर्म | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पद्मशाली | ६९ | ४६.0 % |
| २ | लिंगायत | १२ | 0८.0 % |
| ३ | मुस्लिम | १३ | 0८.७ % |
| ४ | कुरूहिन शेट्टी | १0 | 0६.७ % |
| ५ | मराठा | ७ | 0४.७ % |
| ६ | कोष्टी | १ | 0.७ % |
| ७ | फुलारी | १ | 0.७ % |
| ८ | भामटा | १ | 0.७ % |
| ९ | जानरा | २ | १.३ % |
| १0 | वडार | १ | 0.७ % |
| ११ | रजपूत | ३ | २.0 % |
| १२ | अर्जुन | १ | 0.७ % |
| १३ | शिंपी | १ | 0.७ % |
| १४ | पटेल | १ | 0.७ % |
| १५ | चांभार | १ | 0.७ % |
| १६ | ख्रिश्चन | १ | 0.७ % |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | बेडर | १ | ०.७ % |
| १८ | कोळी | ३ | २.० % |
| १९ | धनगर | २ | १.३ % |
| २० | रेड्डी | १ | ०.७ % |
| २१ | तोगटवीर | २ | १.३ % |
| २२ | मोची | २ | १.३ % |
| २३ | महार | १ | ०.७% |
| २४ | मुदराज | २ | १.३ % |
| २५ | कुंभार | १ | ०.७ % |
| २६ | खाटीक | १ | ०.७ % |
| २७ | लमाण | १ | ०.७ % |
| २८ | पुसला | १ | ०.७ % |
| २९ | निलगार | ४ | ०.७ % |
| ३० | मातंग | १ | ०.७ % |
| ३१ | ढोर | १ | ०.७ % |
| ३२ | सोनार | १ | ०.७ % |
| | एकूण | १५० | १००.०० % |

सारणी क्रमांक ३.५ मध्ये दिलेल्या आकडेवारीनुसार असे निदर्शनास येते की, सर्वाधिक कामगार (४६.०%) पद्मशाली जातीचे असून त्या खालोखाल नुस्लिम समुदायाच्या (०८.७%) कामगारांचा क्रम लागतो. त्याखालोखाल लिंगायत समुदायातील कामगारांचा (०८.०%) क्रम लागतो. पद्मशाली जातीतील लोकांचा प्रामुख्याने यंत्रमाग हाच परंपरागत व्यवसाय आहे. हे लोक प्रामुख्याने आंध्रप्रदेशातील तेलंगणा भागातून स्थानांतरीत झालेले आहेत. कर्नाटक राज्यातून गुलबर्गा, रायचूर, विजापूर येथून आलेल्या लिंगायत समुदायाची संख्या अधिक असल्याचे प्रकर्षाने दिसून येते.

## ३.६ जात प्रवर्ग : (Caste Category)

कामगारांचे जात प्रवर्गानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.६ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ३.६**

**कामगारांचे जात प्रवर्गानुसार केलेले वर्गीकरण**

| अ.क्र. | जात प्रवर्ग | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | उच्च जात प्रवर्ग | २२ | १४.७% |
| २ | अनुसुचित जाती | ०६ | ०४.०% |
| ३ | अनुसुचित जमाती | ०८ | ०५.३% |
| ४ | इतर मागास प्रवर्ग | ११४ | ७६.०% |
| | एकूण | १५० | १००.००% |

सारणी क्रमांक ३.६ मधील आकडेवारी नुसार असे दिसून येते की बहुसंख्य कामगार (७६.०%) इतर मागास वर्गीय आहेत. उच्च जात प्रवर्गातील कामगारांची संख्या कमी आहे. तर अनुसूचीत जाती जमातींचे प्रमाण (९.३%) अत्यल्प आहे.

### ३.७ मातृभाषा : (Mother Tongue)

कामगारांचे मातृभाषेनुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.७ मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ३.७**

**कामगारांचे मातृभाषेनुसार केलेले वर्गीकरण**

| अ.क्र. | मातृभाषा | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | तेलगु | ८९ | ५९.३% |
| २ | कन्नड | २६ | १७.३% |
| ३ | हिंदी | १५ | १0.0% |
| ४ | मराठी | १४ | ९.३% |
| ५ | उर्दु | 0६ | ४.0% |
| | एकूण | १५0 | १00.00% |

सारणी क्रमांक ३.७ मधील आकडेवारी वरून असे निदर्शनास येते की, तेलगु मातृभाषा असलेल्या कामगारांची संख्या (५९.३%) सर्वाधिक आहे. कन्नड मातृभाषा असणाऱ्या लिंगायत समुदायाच्या कामगारांची संख्या त्या खालोखाल (१७.३%) आहे. तर उर्वरित हिंदी, मराठी, उर्दु मातृभाषा बोलणाऱ्या कामगारांचे प्रमाण (२३.३%) आहे.

### ३.८ वैवाहिक दर्जा : (Marital Status)

कामगारांचे वैवाहिक दर्जानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.८ मध्ये दिले आहे.

### सारणी क्रमांक ३.८

### कामगारांचे वैवाहिक दर्जानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | वैवाहिक दर्जा | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विवाहित | १२८ | ८५.३% |
| २ | अविवाहित | २२ | १४.७% |
| | एकूण | १५० | १००.००% |

सारणी क्रमांक ३.८ मधील माहितीवरून असे स्पष्ट होते की, बहुसंख्य (८५.३%) कामगार विवाहित असून, अविवाहित कामगारांचे प्रमाण १४.७% आहे.

## ३.९ कामगारांच्या विवाह वेळचे वय :

कामगारांच्या विवाह वेळच्या वयानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.९ मध्ये दिले आहे.

### सारणी क्रमांक ३.९

### कामगारांच्या विवाहाच्या वेळच्या वयानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | विवाहा वेळेचे वय | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १५ ते २० वर्ष | ७० | ४६.७% |
| २ | २१ ते ३० वर्ष | ८० | ५३.३% |
| | एकूण | १५० | १००.००% |

सारणी क्रमांक ३.९ मधील आकडेवारी वरून असे स्पष्ट होते की, १५ ते २० वर्षे या वयोगटात विवाह केलेल्या कामगारांचे प्रमाण ४६.७% होते तर २१ ते ३० व्या वर्षी विवाह केलेल्या कामगारांचे प्रमाण ५३.३% होते. म्हणजे काही उत्तरदात्यांचा विवाह बालवयात झाल्याचे वरील आकडेवारीवरून सूचित होते.

## ३.१० कुटुंबाचा प्रकार : (Type of Family)

कामगारांचे कुटुंबांच्या प्रकारानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१० मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्रमांक ३.१०**

**कामगारांच्या कुटुंबाच्या प्रकारानुसार केलेले वर्गीकरण**

| अ.क्र. | कुटुंबाचा प्रकार | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एकत्र कुटुंब | ४७ | ३१.३% |
| २ | विभक्त कुटुंब | १०३ | ६८.७% |
| | एकूण | १५० | १००.००% |

सारणी क्रमांक ३.१० मधील आकडेवारी वरून असे दिसून येते की, बहुसंख्य (६८.७%) कामगार कुटूंबे 'विभक्त कुटुंब' या प्रकारची तर उर्वरित (३१.३%) कुटुंबे 'एकत्र कुटुंब' प्रकारची आहेत. औद्योगिकीकरण झालेल्या शहरांमध्ये विभक्त कुटुंबाचे प्रमाण अधिक असल्याचे वरील माहितीवरून सूचित होते.

## ३.११ कुटुंबाचा आकार : (Size of Family)

कुटुंबातील सदस्यांचा एकूण संख्येनुसार कुटुंबाचा आकार ठरतो. कामगारांच्या कुटुंबाच्या आकारावरून केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.११ मध्ये दर्शविले आहे.

## सारणी क्रमांक ३.११

## कामगारांच्या कुटुंबाच्या आकारानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | कुटुंबाचा आकार | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | लहान कुटुंब (२ ते ५) | ९३ | ६२.0% |
| २ | मध्यम कुटुंब (६ ते १०) | ५0 | ३३.३% |
| ३ | मोठे कुटुंब (१० पेक्षा जास्त) | 0७ | 0४.७% |
| | एकूण | १५0 | १00.00% |

सारणी क्रमांक ३.११ मधील आकडेवारी वरून असे दिसून येते की, २ ते ५ सदस्य संख्या असणाऱ्या लहान आकाराच्या कुटुंबाचे प्रमाण अधिक तर त्या खालोखाल मध्यम कुटुंबाचे प्रमाण असल्याचे आढळते. मोठ्या आकाराची कुटुंबे कमीच आहेत. सभासद विवाह होईपर्यंत एकाच कुटुंबात राहतात व विवाहानंतर स्वतंत्र कुटुंब करून राहतात. कामगारात देखील लहान कुटुंब ठेवण्याकडे त्यांचा कल मोठ्या प्रमाणात दिसून आला आहे.

### ३.१२ कामगारांचे मूळ ठिकाण :

कामगारांचे मुळ ठिकाण कोणते? यानुसार वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१२ मध्ये दशविले आहे.

## सारणी क्रमांक ३.१२

## कामगारांच्या मूळ ठिकाणानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | मूळ ठिकाण | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दुसरे शहर | 0६ | 0४.0% |
| २ | ग्रामीण शहर | ३९ | २६.0% |
| ३ | सोलापूर शहर | १0५ | ७0.0% |
| | एकूण | १५0 | १00.00% |

सारणी क्रमांक ३.१२ मधील माहितीवरून असे स्पष्ट होते की, सोलापूर शहर हेच मूळ ठिकाण असणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक (७०.०%)आहे तर इतर शहरातून व जवळपासच्या ग्रामीण भागातील आलेल्या कामगारांचे प्रमाण (३०.०%) आहे.

### ३.१३ कामगार संघटनेचे सभासद :

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या सर्वच कामगार (१५०) कोणत्याही कामगार संघटनेचे सभासद नसल्याचे दिसून आले. याबद्दल अधिक विचारले असता कामगारांनी खालील दोन बाबी सांगितल्या...

१. कामगार संघटनेचे सभासद झाल्यास मालक (कारखानदार) कामगार यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंध संपुष्टात येतील अशी भीती कामगारांना वाटते.

२. सभासद झाल्यास मालक कामावर ठेवणार नाही अशी भीती कामगारांच्या मनात असल्याचे त्यांनी सांगितले.

### ३.१४ शेतजमिनीची मालकी :

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या १५० कामगारांपैकी स्वत:च्या नावाची शेतजमीन नाही असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण ९५.३ असून, शेती असणाऱ्या कामगारांचे प्रमाण ०४.७ आहे. यापैकी कोणत्याही कामगारांची बागायत शेती नाही. उत्पन्नाचा दुसरा कोणताच स्त्रोत नसल्याने यंत्रमाग व्यवसायात कामगार म्हणून त्यांनी काम स्विकारले आहे, असे सूचित होते.

### ३.१५कामगारांच्या वडीलांच्या व्यवसायानुसार केलेले वर्गीकरण:

कामगारांच्या वडिलांचे व्यवसाय कोणते होते यावरून सारणी क्रमांक ३.१५ मध्ये उत्तरदात्यांचे वर्गीकरण केले आहे.

**सारणी क्रमांक ३.१५**

**कामगारांच्या वडीलांच्या व्यवसायानुसार केलेले वर्गीकरण**

| अ.क्र. | वडिलांचा व्यवसाय | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेती | २३ | १४.0% |
| २ | औद्योगिक कामगार | ५१ | ३४.0% |
| ३ | नोकरी | २३ | १५.३% |
| ४ | पारंपारीक व्यवसाय | ५५ | ३६.७% |
| | एकूण | १५0 | १00.00% |

सारणी क्रमांक ३.१५ मधील माहितीवरून असे निदर्शनास येते की, जातिविशिष्ट पारंपारीक व्यवसाय करणाऱ्या उत्तरदात्यांच्या वडीलांचे प्रमाण सर्वाधिक (३६.७%) आहे. तर औद्यागिक कामगारांचे प्रमाण हे ३४.0% आहे. त्यानंतर नोकरी व शेती यांचे प्रमाण आहे. याचाच अर्थ असा की ६६.0% कामगारांच्या बाबतीत आंतरपीढीय व्यावसायिक गतिशीलता दिसून येते.

**३.१६ कामगारांच्या सध्याच्या कामाचे वर्गीकरण :**

कामगारांच्या सध्याच्या कामाच्या स्वरूपावरून त्यांचे वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१६ मध्ये दर्शवले आहे.

## सारणी क्रमांक ३.१६

### कामगारांच्या सध्याच्या कामाच्या स्वरूपानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | कामाचे प्रकार | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | डब्लिंग | १२ | ०८.३% |
| २ | रोलींग | १४ | ०९.३% |
| ३ | डार्यींग | १० | ०६.७% |
| ४ | वायडिंग | १८ | १२.०% |
| ५ | वॉपिंग | ०६ | ०४.०% |
| ६ | विव्हिंग | ६१ | ४०.७% |
| ७ | शिलाई | ११ | ०७.३% |
| ८ | कटिंग | ११ | ०७.३% |
| ९ | जाबर | ०७ | ०४.७% |
| | एकूण | १५० | १००.००% |

सारणी क्रमांक ३.१६ मधील माहितीवरून असे स्पष्ट होते की, यंत्रमाग कारखान्यात विव्हिंग विभागातील कामगारांचे प्रमाण सर्वाधिक (४०.७%) आहे. त्यानंतर वायडिंग व रोलिंग विभागात काम करणाऱ्यांचे प्रमाण आहे. डब्लिंग व डार्यींग विभागात काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण १५% दिसून आले.

यंत्रमाग व्यवसायात सर्वात महत्त्वाचे व जबाबदारीचे काम विव्हिंग (विणणे) विभागात असते. या कामासाठी अत्यंत कुशल अशा कामगारांची आवश्यकता असते एक कुशल कामगार एका दिवसात ८ ते १० चादरी विणून पूर्ण करतो.

## ३.१७ कामगारांच्या कुटुंबातील काम (नोकरी) करणारे सदस्य:

स्वत: कामगाराव्यतिरिक्त कुटुंबातील इतर नोकरी करणाऱ्या सभासदांचे वर्गीकरण सारणी क्रमांक ३.१७ मध्ये दशविले आहे.

**सारणी क्रमांक ३.१७**

**काम करणाऱ्या सदस्यानुसार केलेले वर्गीकरण**

| अ.क्र. | काम करणारे सदस्य | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ व्यक्ति | २८ | १८.७% |
| २ | २ ते ४ सदस्य | ११८ | ७८.७% |
| ३ | ५ ते १0 सदस्य | 0४ | 0२.७% |
| | एकूण | १५0 | १00.00% |

सारणी क्रमांक ३.१७ मधील माहितीवरून असे स्पष्ट होते की, कामगारा व्यतिरिक्त ज्यांच्या कुटुंबातील इतर २ ते ४ सदस्य अर्थार्जनासाठी काही काम नोकरी करतात त्यांचे प्रमाण सर्वाधिक ७८.७% आहे. तर एक अन्य व्यक्ती काम करणारी असणाऱ्यांचे प्रमाण १८.७ आहे. तर ५ ते १0 सदस्य काम करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अत्यल्प आहे. वरील माहितीवरून असे सूचित होते की, उत्तरदात्यांची कुटुंबे सापेक्षत: गरीब असून अन्य सदस्यांनाही अथार्जन करावे लागते.

## ३.१८ यंत्रमाग व्यवसायातील सेवेची एकूण वर्षे :

यंत्रमाग व्यवसायात उत्तरदाते किती वर्षे काम करीत आहेत याविषयीची माहिती सारणी क्रमांक ३.१८ मध्ये सादर केली आहे.

## सारणी क्रमांक ३.१८

### यंत्रमाग व्यवसायातील कामगारांचा अनुभव

| अ.क्र. | एकूण वर्ष | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ ते १० वर्ष | ६० | ४०.०% |
| २ | ११ ते २० वर्ष | ६० | ४०.०% |
| ३ | २१ ते ३० वर्षे | २५ | १६.७% |
| ४ | ३० पेक्षा अधिक वर्षे | ०५ | ०३.३% |
| | एकूण | १५० | १००.००% |

सारणी क्रमांक ३.१८ मधील माहितीवरून असे स्पष्ट होते की, १ ते २० वर्षे यंत्रमाग व्यवसायात काम करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक ८०.०% आहे तर २१ ते ३० वर्षे या व्यवसायात काम करणाऱ्यांची संख्या १६.७% आहे.

### ३.१९ कामगारांचे वेतन :

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या १५० कामगारांपैकी ९१.३% कामगारांचे वेतन हे साप्ताहिक आहे तर ०६.०% कामगारांचे वेतन मासिक प्रकारचे आहे. फक्त २.७% कामगारांचे वेतन हे दैनंदिन प्रकारचे आहे.

## ३.२० कामगारांना सध्या मिळणारे वेतन :

कामगारांना सध्या मिळणाऱ्या मासिक वेतनानुसार त्यांचे वर्गीकरण सारणी क्रमांक ३.२० मध्ये दशविले आहे.

**सारणी क्रमांक ३.२०**

**कामगारांना सध्या मिळणारे मासिक वेतनानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | सध्याचे वेतन | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ३०० ते ४०० रू. | ५३ | ३५.३% |
| २ | ४०१ ते ६०० रू. | ६७ | ४४.७% |
| ३ | ६०१ ते ८०० रू. | २० | १३.३% |
| ४ | १००० ते ४००० रू. | १० | ०६.७% |
| | एकूण | १५० | १००.००% |

सारणी क्रमांक ३.२० मधील माहितीवरून असे दिसून येते की, १००० ते ४००० रू वेतन घेणारे हे जॉबर असतात व त्यांचा पगार मासीक असतो. पगार निश्चित असतो. ६०१ ते ८०० रूपये वेतन घेणारे हे विणकर कामगार आहेत त्यांचे प्रमाण १३.३% आहे. इतर विभागात काम करणाऱ्यांचे पगार हे ४०१ ते ६०० रूपये आहे. याचे प्रमाण सर्वाधिक ४४.७% आहे तर ३०० ते ४०० रूपये वेतन घेणारे हे शिलाई व कटिंग करणारे कामगार आहेत त्यांचे प्रमाण ३५.३% आहे.

## ३.२१ बोनस :

प्रत्येक कामगारांना बोनस म्हणून काही रक्कम देण्याचा नियम औद्योगिक क्षेत्रात आहे. सोलापूर शहरात ही निवड केलेल्या १० यंत्रमाग कारखान्यातील १५० कामगारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेताना असे निदर्शनास आले की प्रत्येक कारखानदार प्रत्येक दिपावलीस एक महिन्याचा आगाऊ पगार व एक महिन्याचा अधिक पगार बोनस म्हणून देतात.

### ३.२२ कामगारांचे वार्षिक उत्पन्न :

यंत्रमाग व्यवसायात काम करणाऱ्या कामगाराव्यतिरिक्त त्या कुटुंबातील इतर सदस्यांचे आर्थिक उत्पन्न लक्षात घेऊन त्या कामगारांचे सरासरी वार्षिक उत्पन्न काढून त्याचे वर्गीकरण सारणी क्रमांक ३.२२ मध्ये केले आहे.

**सारणी क्रमांक ३.२२**

**कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्नानुसार उत्तरदात्यांचे वर्गीकरण**

| अ.क्र. | एकूण उत्पन्न | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ५००० ते ९००० रू. | ०१ | ०.७% |
| २ | १०००० ते २०००० रू. | १८ | १२.०% |
| ३ | २०००१ ते ४०००० रू. | ८१ | ५४.०% |
| ४ | ४०००१ ते ६०००० रू. | ३५ | २३.३% |
| ५ | ६०००१ ते ८०००० रू. | १५ | १०.०% |
| | एकूण | १५० | १००.००% |

सारणी क्रमांक ३.२२ मधील माहितीवरून असे स्पष्ट होते की, २०,००१ ते ४०,००० रूपये सरासरी कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वाधिक ५४.०% आहे. तर ४०,००१ ते ६०,००० वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कामगारांचे प्रमाण २३.३% आहे.

### ३.२३ कामगारांच्या कुटुंबाचा सरासरी मासिक खर्च :

कामगारांच्या कुटुंबाच्या सरासरी मासिक खर्चानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३.२३ मध्ये दर्शविले आहे.

## सारणी क्रमांक ३.२३

### कामगारांच्या कुटुंबाच्या सरासरी मासिक खर्चानुसार केलेले वर्गीकरण

| अ.क्र. | मासिक खर्च | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ५00 ते ९00 रू. | 0१ | 0.७% |
| २ | १000 ते २000 रू. | ६१ | ४0.७% |
| ३ | २00१ ते ४000 रू. | ७३ | ४८.७% |
| ४ | ४00१ ते पेक्षा अधिक | १५ | १0.0% |
| | एकूण | १५0 | १00.00% |

सारणी क्रमांक ३.२३ नुसार प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील कामगारापैंकी बहुसंख्य (४८.७%) कामगारांचा मासिक खर्च २00१ रूपये ते ४000 रूपयापर्यंत आहे. त्या खालोखाल ४0.७% कामगारांचा मासिक खर्च २000 रूपयापर्यंत आहे. फक्त १0% लोकांचा मासिक खर्च ४000 रूपयापेक्षा अधिक आहे.

### ३.२४ कर्ज :

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील कामगारापैंकी ४७ (३१.0३%) कामगारांनी कर्ज घेतलेले आहे. त्यापैकी २७(१८.0%) कामगारांनी ५000 रूपयापर्यंत कर्ज घेतले आहे. तर 0९ (0६.0%) कामगारांनी १0,000 रूपयापर्यंत कर्ज घेतलेले आहे. ३0,000 रूपयापर्यंत कर्ज घेतलेल्यांचे प्रमाण 0६.६% आहे.

### ३.२५ कर्जाचे कारण :

अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील कामगारापैंकी बहुसंख्य २१ (१४.0%) कामगारांनी आपल्या मुला-मुलींच्या विवाहासाठी कर्ज घेतले आहे. तर ११

(०७.३%) कामगारांनी घर बांधणीसाठी घेतले आहे. उर्वरित १५(१०.0%) कामगारांनी शिक्षण व इतर (दवाखाना, घरभाडे) कारणासाठी कर्ज घेतले आहे.

**३.२६ कर्ज उपलब्धतेचे मार्ग :**

अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील कामगारांनी कर्ज कोणाकडून घेतले याचे सारणी क्रमांक ३.२६ मध्ये वर्गीकरण केले आहे.

**सारणी क्रमांक ३.२६**

**कर्ज उपलब्धतेच्या मार्गाचे वर्गीकरण**

| अ.क्र. | कर्जाचे मार्ग | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बॅंक, पतपेढी, सोसायटी | २३ | १५.0% |
| २ | सावकार, नातेवाईक, भिशी | २४ | १६.0% |
| ३ | मिल मालक | ४७ | ३१.0३% |
| | एकूण | १५0 | १00.00% |

सारणी क्रमांक ३.२६ मधील आकडेवारी वरून असे स्पष्ट होते की, १६% कामगारांनी खाजगी स्त्रोतामार्फत कर्ज घेतले आहे तर १५.३% कामगारांनी बॅंक व पतपेठी कडून कर्ज घेतले आहे.

**३.२७ कर्जाच्या रकमेवरील व्याज दर :**

अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील कामगारांपैंकी ४७ कामगारांनी कर्ज घेतले आहे. त्यापैंकी १३.३% कामगारांनी २ टक्के दराने तर 0९.३% लोकांनी ४ टक्के दराने कर्ज घेतले आहे. ७.३% लोकांनी १0 टक्के दराने कर्ज घेतले आहे. तर १२ टक्के दराने २ कामगारांनी कर्ज घेतले आहे.

**३.२८ कामगारांच्या घरातील भौतिक वस्तूंची उपलब्धता :**

समाजामध्ये एखाद्या व्यक्तीचे सर्वसाधारण राहणीमान कोणत्या दर्जाचे आहे हे ठरविण्याचे काही मानदंड ठरले आहेत. त्यापैंकी एक म्हणजे व्यक्तीच्या घरातील

भौतिक वस्तुची उपलब्धता. एखाद्या व्यक्तीच्या घरामध्ये किमान भौतिक वस्तू उपलब्ध असतील तर त्या व्यक्तीचे राहणीमान मध्यम दर्जाचे आहे असे सांगितले जाते. काही भौतिक वस्तु त्या उपलब्ध करून घेण्यासाठी सर्व सामान्यांची धडपड सुरू असते. कामगार ही त्या गोष्टीला अपवाद नाही. अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील कामगारांपैकी ४२.0% कामगारांच्या घरात साधी खुर्ची आहे. ३८.७% कामगारांच्या घरात पलंग आहे. तर ३७.७% कामगारांच्या घरात कपाट आहे. काही कामगारांच्या घरात वरील सर्व वस्तु आहेत. काही कामगारांकडे दोन वस्तु आहेत. तर काही कामगारांकडे वरील पैकी फक्त एकच वस्तु आहे.

**३.२९ विजेवर चालणाऱ्या वस्तुंची उपलब्धता :**

अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील १५0 कामगारांपैकी १३३ (८८.७%) कामगारांच्या घरी विजेची सोय आहे. त्यापैकी ६0 कामगारांच्याकडे पंखा आहे. २९.३% कामगारांकडे टेपरेकार्डर आहे. तर ५४.0% कामगारांकडे दूरदर्शन संच आहे. तर १८.0% कामगारांच्या घरात डि.व्ही.डी. आहे.